21 FEB FRONT PAGE_Layout 1 2/21/2026 5:30 PM Page 1

सायंदैनिक
गुड इव्हिनिंग City
goodeveningcity@gmail.com
२१ फेब्रुवारी २०२६, शनिवार | वर्ष १४ वे | अंक २७३ | पृष्ठे ६




# लोणार तालुक्यात चिखला काकड गावात पुतळ्यावरून वाद पेटला!

**लोणार, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील चिखला काकड गावात सध्या प्रचंड तणाव निर्माण झाला आहे.

उबाठा शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख संजीवनी वाघ यांना गावातीलच काही जणांनी बेदम मारहाण केली आहे. ही मारहाण गावचे सरपंच आणि त्यांच्या समर्थकांनी केल्याचा आरोप संजीवनी वाघ यांनी केला आहे. आपल्या अंगावरील कपडे फाडले असा आरोप संजीवनी वाघ यांनी केला असून तसे व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.



याबाबत सविस्तर वृत्त मिळालेल्या माहितीनुसार, लोणार तालुक्यातील चिखला काकड गावात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या उभारणीवरून तीव्र वाद उफाळून आला असून या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आहे. या घटनेत उबाठा शिवसेनेच्या महिला उपजिल्हाप्रमुख संजीवनी वाघ यांना तसेच त्यावेळी त्यांच्या सोबत असलेल्या इतर सहकाऱ्यांना मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले असून परिसरात तसेच सोशल मीडियावर या घटनेचा संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे अत्यंत व्यथित झालेल्या संजीवनी वाघ यांनी या प्रकरणानंतर काल रात्री आपल्या व्हॉट्सअप स्टेट्सवर शनिवारी सकाळी ७ वाजता आत्महत्या करणार असा मजकूर लिहिला आहे त्यामुळे एकच खळबळ उडाली होती. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती आटोक्यात आणली. दरम्यान, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या घटनेनंतर गावात तणावाचे वातावरण आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांकडून सतर्कता बाळगण्यात येत आहे. आज रोजी गावात पोलीस बंदोबस्त तैनात असून परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती व्यक्त होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा वाचवण्याची हीच का सजा असा संतप्त सवाल संजीवनी वाघ यांनी उपस्थित केला आहे.

# रामनगरमध्ये पुतळा उभारणीवरून पहाटे तणाव

## पोलिसांचा कडक बंदोबस्त, गावात तणावपूर्ण शांतता



**खामगाव, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** खामगाव तालुक्यातील रामनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या उभारणीच्या मुद्द्यावरून आज पहाटे तणावाची परिस्थिती निर्माण झाली. अचानक उफाळलेल्या वादानंतर पोलिसांचा मोठा फौजफाटा गावात दाखल झाला. सध्या परिस्थिती नियंत्रणात असली तरी रामनगरमध्ये तणावपूर्ण शांतता कायम आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सार्वजनिक जागेवर पुतळा उभारण्याबाबत गेल्या काही महिन्यांपासून स्थानिक पातळीवर चर्चा सुरू होती. आज पहाटे या मुद्द्यावरून दोन्ही बाजूंमध्ये वाद निर्माण झाल्याची माहिती पोलिसांना मिळताच खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्यासह अतिरिक्त पोलिस कुमक तातडीने घटनास्थळी दाखल झाली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी तत्काळ परिस्थिती हाताळत बंदोबस्त वाढविला. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी गावात कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. संवेदनशील ठिकाणी पोलिसांची गस्त वाढविण्यात आली असून, परिस्थितीवर सातत्याने बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. अफवा पसरवू नयेत आणि शांतता राखावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, वाद मिटविण्यासाठी प्रशासनाकडून दोन्ही बाजूंच्या प्रतिनिधींशी चर्चा सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. संवादातून तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असून, प्रशासनाच्या हस्तक्षेपामुळे परिस्थिती नियंत्रणात असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. नागरिकांनी संयम राखून प्रशासनाला सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# नदीपात्रात युवतीचा मृतदेह; बोराखेडी शिवारात खळबळ

**बोराखेडी, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** शहरालगतच्या बोराखेडी शिवारात असलेल्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या मागील बाजूस नदीपात्रात एका युवतीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. गुरुवारी सकाळच्या सुमारास हा प्रकार उघडकीस येताच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, मृत्यू संशयास्पद असल्याने विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.




प्राथमिक माहितीनुसार, बोराखेडी शिवारातील नदीपात्रात मृतदेह आढळून आल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ याबाबत पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच बोराखेडी पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेण्यात आला असून पुढील तपासाला सुरुवात करण्यात आली आहे.

दरम्यान, घटनास्थळी फॉरेन्सिक पथकाने भेट देत विविध नमुने संकलित केले आहेत. प्राथमिक पाहणीत मृत्यू संशयास्पद स्वरूपाचा असल्याचे पोलिस सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. सदर युवतीचा मृत्यू अपघाती आहे की आत्महत्येचा प्रकार आहे, अथवा अन्य कोणता गुन्हा घडला आहे, याबाबत सध्या कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून, शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले. तोपर्यंत सर्व शक्यता तपासल्या जात असून, युवतीची ओळख पटविण्याचे कामही सुरू आहे. या घटनेमुळे बोराखेडी परिसरात तणावाचे वातावरण असून, नागरिकांकडूनही विविध चर्चा सुरू आहेत. प्रकरणाचा पुढील तपास बोराखेडी पोलीस करीत आहेत.

# पोलिस भरतीला आलेल्या तरुणाचा धावताना मृत्यू

**छ.संभाजीनगर, २१ फेब्रुवारी (वृत्तसंस्था) :** छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असलेल्या पोलिस भरतीत एका २३ वर्षीय तरुणाचा १६०० मीटर धावताना मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून पोलिस होण्यासाठी आलेल्या या तरुणाचा मैदानावरच प्राण गेल्याने भरती प्रक्रियेला उपस्थित असलेल्या उमेदवारांवर शोककळा पसरली आहे. आज सकाळच्या सत्रात मैदानी चाचणी सुरू असताना ही घटना घडली.

मृत तरुणाचे नाव संग्राम धोंडीराम शिंदे असे असून तो सांगली जिल्ह्याचा रहिवासी होता. पोलिस भरती प्रक्रियेसाठी तो छत्रपती संभाजीनगर येथे दाखल झाला होता. आज सकाळी सुमारे ८.१५ वाजता शहरातील ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या मैदानावर १६०० मीटर धावण्याची चाचणी सुरू होती. त्यात सहभागी झालेल्या संग्रामने धाव सुरू केली; मात्र काही अंतर पार केल्यानंतर त्याला अचानक चक्कर आल्याचे सांगितले जाते.




# जळगावातील बड्या पदाधिकाऱ्याचा विधवेवर बलात्कार

## एकनाथ खडसे यांच्या आरोपाने खळबळ

**जळगाव, २१ फेब्रुवारी (वृत्तसंस्था) :** सत्ताधारी पक्षाच्या जळगावमधील एका बड्या पदाधिकाऱ्याने विधवा महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याचा खळबळजनक आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी केला आहे. खडसेंनी या प्रकरणी सदर बड्या नेत्याचे नाव घेतले नाही, पण पोलिसांवर त्याला पाठिशी घालण्याचा आरोप केला आहे. यामुळे हा बडा पदाधिकारी कोण? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.



एकनाथ खडसे पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, सावदा परिसरातील एका मोठ्या गावातील विधवा महिलेवर बलात्कार करण्यात आला आहे. हा बलात्कार एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने केला आहे. पीडित महिला या प्रकरणी तक्रार दाखल करण्यासाठी सावदा पोलिस ठाण्यात गेली होती. ती तिथे दुपारी १२ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत थांबली. पण त्यानंतरही तिची तक्रार नोंदवून घेण्यात आली नाही. आरोपी मोठ्या पक्षाचा मोठा पदाधिकारी आहे. तर पीडित महिला विधवा आहे. तिची तक्रार दाखल करून न घेणे हा गंभीर गुन्हा आहे.




गुड इव्हिनिंग City | बातम्या तसेच जाहीरातीसाठी संपर्क | प्रकाशक : रणजीतसिंग राजपूत ९८५०३७७३४४ | संपादक : ॲड. हरीदास उंबरकर ९७६३४६९१८४ // गुड इव्हिनिंग सिटी सोशल मिडीयावर सुद्धा... | किंमत १ रू.

## राज्य परिवहन सवलतीच्या तिकीटासाठी कार्ड अनिवार्य

# रुपे ऑन द गो (एनसीएमसी) कार्डचे वितरण लवकरच

**बुलढाणा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बुलढाणा विभागामार्फत प्रवाशांसाठी 'रुपे ऑन द गो' (एनसीएमसी) सक्षम वैयक्तिक कार्ड लवकरच वितरित करण्यात येणार आहे. राज्य परिवहनाच्या सवलतीच्या तिकीटांसाठी हे कार्ड अनिवार्य करण्यात आले असून, सवलतधारी तसेच विनासवलतधारी सर्व प्रवाशांना या कार्डद्वारे तिकीट, पास, टॉप-अप आणि डिजिटल वॉलेट सुविधा मिळणार आहेत.

महामंडळाच्या माहितीनुसार, हे वैयक्तिक व अहस्तांतरणीय कार्ड असून त्यावर कार्डधारकाचे नाव व छायाचित्र असणार आहे. कार्डमध्ये सवलत सुविधा, ऑनलाईन व ऑफलाईन वॉलेटचा समावेश राहील. सवलतीचे तिकीट काढताना ऑफलाईन वॉलेटमध्ये आवश्यक भाड्याइतकी शिल्लक असणे बंधनकारक राहील. ऑनलाईन वॉलेटमध्ये मोबाईल, नेट बँकिंग अथवा UPIद्वारे टॉप-अप करता येईल. आरक्षण (मोबाईल ॲप/पीओआरएस) व इतर व्यवहारांसाठी ऑनलाईन वॉलेटचा वापर करता येणार आहे. ऑनलाईन वॉलेटमधील रक्कम ऑफलाईन वॉलेटमध्ये हस्तांतरित करण्याची सुविधाही उपलब्ध असेल.

कार्डची नोंदणी व वितरण प्रक्रिया महामंडळाच्या २५१ आगारांतील अधिकृत एजंट, सुमारे ३३५ वाहतूक नियंत्रण कक्ष तसेच NSDL पेमेंट बँकमार्फत नियुक्त ३ हजारांहून अधिक एजंटद्वारे राबविण्यात येणार आहे. टॉप-अपवर ०.९ टक्के सुविधा शुल्क व जीएसटी आकारला जाईल. विद्यार्थी, मासिक, त्रैमासिक व इतर पासेसचे टॉप-अप ५० रुपयांच्या पटीत करणे आवश्यक राहील. आगार, बसस्थानके, अधिकृत एजंट, संकेतस्थळ, मोबाईल ॲप तसेच वाहकाच्या ईटीएम मशिनद्वारे टॉप-अपची सुविधा उपलब्ध राहणार आहे.



कार्डच्या किमतीत नवीन नोंदणीसाठी १११ रुपये (करांसह), जुन्या स्मार्टकार्डधारकांनी कार्ड जमा केल्यास १४९ रुपये, तर कार्ड हरवले किंवा खराब झाल्यास १९९ रुपये आकारले जाणार आहेत. तांत्रिक दोष किंवा चुकीची छपाई असल्यास कार्ड विनामूल्य बदलून देण्यात येईल. या कार्डमध्ये शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी पास, दिव्यांग, ज्येष्ठ व अमृत ज्येष्ठ नागरिक, महिला सन्मान योजना तसेच विविध विशेष श्रेणीतील सवलतींचा समावेश राहणार आहे. कार्ड वितरण सुरू झाल्यानंतर प्रवाशांनी तातडीने नोंदणी करून सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्य परिवहन महामंडळाने केले आहे.

# स्किल पॅरामेडिकल कॉलेजकडून रक्तगट तपासणी शिबीर उत्साहात




**बुलढाणा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : स्किल पॅरामेडिकल कॉलेज, बुलढाणा यांच्या वतीने श्री शिवाजी हायस्कूल, शेलसूर येथे १७ फेब्रुवारी रोजी रक्तगट तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या शिबिरामध्ये रक्तगट तपासणीचे सर्व कार्य स्किल पॅरामेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीच अत्यंत शिस्तबद्ध व वैज्ञानिक पद्धतीने पार पाडले. विद्यार्थ्यांनी रक्तनमुने संकलित करून अचूक तपासणी केली व प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांचा रक्तगट नमूद असलेले प्रमाणपत्र प्रदान केले. त्यांच्या कौशल्यपूर्ण कार्याचे सर्वांनी कौतुक केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक डी. एम. कापसे उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्त्व समजावून सांगितले व अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढते असे नमूद केले.

या शिबिराचे आयोजन प्रा.प्रियांका काकडे, प्रा.शुभम सुरडकर व प्रा.अभिषेक पाटील यांनी केले व शिबिर सुरळीत पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमास श्री शिवाजी हायस्कूल चे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली असून समाजसेवेची भावना अधिक दृढ झाली आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहभागी सर्वांचे आभार मानण्यात आले.

# 'हिंद दी चादर' शहीदी समागम सोहळा

## जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी दाखवला चित्ररथाला झेंडा



**बुलढाणा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : शीख धर्माचे नववे गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम सोहळ्यानिमित्त 'हिंद दी चादर' अंतर्गत राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर सिंधुदुर्ग जिल्ह्यात जनजागृती अभियानास उत्साहात प्रारंभ झाला आहे. खारघर, नवी मुंबई येथे २८ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत होणाऱ्या समागम सोहळ्याच्या निमित्ताने जिल्ह्यात दाखल झालेल्या चित्ररथाला जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी झेंडा दाखवून अभियानाचा शुभारंभ केला.

या कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी शुभांगी साठे, निवासी उपजिल्हाधिकारी मच्छिंद्र सुकटे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक श्रीपाद दामले, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत, तहसीलदार चैताली सावंत, कोल्हापूर जिल्हा माहिती कार्यालयाचे माहिती अधिकारी फारुक बागवान, नायब तहसीलदार प्रदीप पवार, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक गणेश हुक्केरी तसेच जिल्हास्तरीय समितीचे सदस्य उपस्थित होते.

चित्ररथांच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध तालुके, शहर व ग्रामीण भागांत जाऊन 'हिंद दी चादर' या उपाधीने सन्मानित गुरू तेग बहादूर साहिब यांच्या त्याग, शौर्य, धार्मिक सहिष्णुता आणि मानवतेच्या संदेशाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. गुरु तेग बहादुर यांच्या कार्यावर आधारित ध्वनीचित्रफितीद्वारे समाजातील सर्व घटकांमध्ये जागृती निर्माण केली जाणार आहे.

जिल्हाधिकारी धोडमिसे यांनी यावेळी सांगितले की, ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त जिल्ह्यात विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. चित्ररथ हे त्यातील महत्त्वाचे माध्यम असून, समाजात एकात्मता, बंधुता आणि धार्मिक स्वातंत्र्याचा संदेश पोहोचविणे हा या अभियानाचा उद्देश आहे. समागम सोहळ्यासाठी जाणाऱ्या भाविकांना आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन सुरू केले आहे. वाहतूक, निवास, आरोग्य व सुरक्षा व्यवस्थेबाबत नियमित आढावा बैठका घेऊन तयारीचे सूक्ष्म नियाजन केले जात आहे. खारघर, नवी मुंबई येथे होणारा हा समागम सोहळा राज्यस्तरावर मोठ्या प्रमाणावर आयोजित केला जाणार असून, त्यासाठी विविध विभाग समन्वयाने काम करत आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी या जनजागृती अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद देत समागम सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले.

# गंभीर रुग्णांसाठी जिल्ह्यात पॅलिअटिव्ह केअर सेवेचा प्रारंभ

**बुलढाणा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : गंभीर व दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त रुग्णांना दिलासा देण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यात पॅलिअटिव्ह केअर (Palliative Care) सेवेचा प्रारंभ करण्यात आला आहे. असाध्य व जीवघेण्या आजारांमुळे त्रस्त रुग्णांना औषधोपचारासोबतच समुपदेशन, मानसिक आधार व सामाजिक सहाय्य उपलब्ध करून देणे हा या सेवेचा मुख्य उद्देश आहे.

पॅलिअटिव्ह केअर अंतर्गत कर्करोग, किडनी किंवा यकृत निकामी, अर्धांगवायू, दीर्घकालीन श्वसन विकार तसेच इतर असाध्य आजारांनी ग्रस्त रुग्णांना वेदना नियंत्रण, लक्षणांवर उपचार, मानसिक मार्गदर्शन आणि कुटुंबीयांना समुपदेशन करण्यात येणार आहे. ही सेवा जिल्हा रुग्णालय, बुलढाणा तसेच ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, आरोग्य कर्मचारी आणि आशा कार्यकर्त्यांच्या माध्यमातून रुग्णांच्या घरी भेट देऊनही सेवा पुरविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

गंभीर रुग्णांचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांच्या वेदना कमी करण्यासाठी पॅलिअटिव्ह केअर सेवा अत्यंत महत्त्वाची आहे. या सेवेचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी केले. तर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनीही या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त करत सांगितले की, जिल्हा रुग्णालय व सर्व अधिनस्त आरोग्य संस्थांमार्फत गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी आवश्यक ती सर्व तयारी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील पात्र रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# उमरा देशमुख येथे घरफोडी

**डोणगाव, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : मेहकर तालुक्यातील उमरा देशमुख येथे घरातील कपाटातून १ लाख ४० हजार रुपये चोरीस गेल्याची घटना १९ ते २० फेब्रुवारीदरम्यान मध्यरात्री घडली. या प्रकरणी डोण-गाव पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अशोकराव केशवराव देशमुख (वय ६९, व्यवसाय शेती, रा. उमरा देशमुख) हे १९ फेब्रुवारीच्या रात्री घरी झोपले होते. मध्यरात्री १ वाजताच्या सुमारास ते उठले असता घरातील कपाट उघडे असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ कुटुंबीयांना जागे करून पाहणी केली असता कपाटात ठेवलेली १ लाख ४० हजार रुपयांची रोकड आढळून आली नाही. गावातीलच एका विरोधात संशय व्यक्त केला आहे. त्यानुसार डोणगाव पोलिसांनी प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे.

# बेपत्ता इसमाची वडनेर भोलजीत आत्महत्या

**नांदुरा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : तालुक्यातील वडनेर भोलजी येथे एका इसमाने आत्महत्या केल्याची घटना १९ फेब्रुवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

याबाबत विष्णू माधवराव ताडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, गजानन माधवराव ताडे (५०) रा. मलकापूर हे काही दिवसांपासून बेपत्ता होते. यासंदर्भात १५ फेब्रुवारी रोजी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. दरम्यान, १९ फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे ८.४५ वाजण्याच्या सुमारास वडनेर भोलजी येथील एनएच-५३ मार्गालगत असलेल्या पंचमुखी हनुमान मंदिराच्या सभामंडप परिसरात गजानन ताडे यांचा मृतदेह आढळून आला. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या प्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची (मर्ग) नोंद करण्यात आली असून पुढील चौकशी पोलीस कर्मचारी प्रमोद चिखलकर करत आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते शेतकरी प्रबोधन कार्यशाळेचे उद्घाटन



**बुलढाणा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : शेतकऱ्यांनी आता केवळ पारंपारिक पिकांवर अवलंबून न राहता शाश्वत शेती आणि जोडधंद्यांकडे वळले पाहिजे. बिजोत्पादन, फळबागा आणि भाजीपाला उत्पादनातून शेतकरी आपली आर्थिक प्रगती निश्चितच साधू शकतात, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

चिखली येथील शिवाजी महाविद्यालयात आयोजित 'शेतकरी प्रबोधन कार्यशाळेच्या' उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्र आणि शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात बोलताना हर्षवर्धन देशमुख यांनी जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्या कार्याचा गौरव केला. जिल्ह्याचा प्रमुख जर शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करणारा असेल, तर तो जिल्हा सर्व स्तरावर प्रगती करतो. जिल्हाधिकाऱ्यांनी सावकारी पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता करून त्यांना जमिनीचे पट्टे मिळवून दिले, हे कार्य समाजहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले. याप्रसंगी जिल्हाधिकाऱ्यांचा शाल व सन्मानपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी देशाचे पहिले कृषिमंत्री म्हणून मांडलेली धोरणे आजही शेतीसाठी तितकीच उपयुक्त असल्याचेही देशमुख यांनी नमूद केले. या कार्यशाळेच्या निमित्ताने शेती उत्पादित धान्य, फळे आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे भव्य प्रदर्शन भरवण्यात आले होते, ज्याला शेतकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रमोद पडोळे यांनी, तर सूत्रसंचालन गणेश मालटे यांनी केले. याप्रसंगी जिल्हा कृषी अधीक्षक संतोष डाबरे, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अमोल झापे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# सहा वर्षांच्या चिमुकल्या सय्यद जोहान सय्यद अजमतचा पहिला रोजा

**बुलढाणा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : शहरातील टिपू सु-लतान चौक परिसरात राहणाऱ्या अवघ्या सहा वर्षांच्या चिमुकल्या सय्यद जोहान सय्यद अजमत यांनी पवित्र रमजान महिन्यात आपला पहिला रोजा ठेवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. एवढ्या लहान वयात रोजा पाळण्याचा त्यांचा निर्धार पाहून परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.

इस्लाम धर्मात रमजान महिन्याला विशेष महत्त्व आहे. या पवित्र महिन्यात मुस्लिम बांधव पहाटेच्या 'सहरी'पासून ते सूर्यास्तानंतरच्या 'इफ्तार'पर्यंत उपवास (रोजा) करतात. संयम, शिस्त, प्रार्थना आणि इतरांप्रती सहानुभूती यांचा संदेश देणारा हा महिना मानला जातो. अशा या पवित्र काळात सय्यद जोहान यांनी कुटुंबातील मोठ्यांकडून प्रेरणा घेत रोजा ठेवण्याचा निर्णय घेतला.

सय्यद जोहान यांचे वडील सय्यद अजमत यांनी सांगितले की, जोहानने स्वतःहून रोजा ठेवण्याची इच्छा व्यक्त केली. आम्ही त्याला समजावून सांगितले, पण त्याचा उत्साह आणि



श्रद्धा पाहून आम्ही त्याला प्रोत्साहन दिले. आईनेही त्याच्या जिद्दीचे कौतुक केले.

रोजा पूर्ण केल्यानंतर कुटुंबीयांनी त्याचे कौतूक केले. सय्यद जोहान यांच्या या कृतीतून लहान वयातही संस्कार आणि श्रद्धा किती प्रभावी असू शकतात, याचा प्रत्यय येतो. त्यांच्या या उपक्रमामुळे इतर मुलांनाही प्रेरणा मिळत असून, समाजात सकारात्मक संदेश पोहोचत आहे.

गुड इव्हिनिंग City

तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## डॅन कोणी आणि का तयार केला ?

चॅटजीपीटीची पालक संस्था व निर्माते ओपनएआय या कंपनीने वापरकर्त्यांना चॅटबॉटच्या सानुकूलित आवृत्त्या तयार करण्याची परवानगी दिली आहे. यासाठी थोडी कोडिंग व मशीन लर्निंगची माहिती, तसेच मोठे डेटा संच हाताळायचे प्रशिक्षण असणे गरजेचे आहे. बीबीसी आणि बिझनेस इनसाइडर मासिकाने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार, डॅनचे कोडिंग एका अमेरिकन विद्यार्थ्याने केले. मागील महिन्यात स्वतःचे संपूर्ण नाव न सांगण्याच्या अटीवर त्याने पत्रकारांशी संवाद साधला. कायदेशीर अडचणी टाळायला तो स्वतःची ओळख वॉकर अशी देतो. रेड्डीट सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील पोस्ट स्क्रोल करताना अनेकांनी चॅटजीपीटीच्या शिव्या देणाऱ्या, क्रूरपणे वाईट बोलणाऱ्या आवृत्त्या तयार केल्याचे पाहिले. परंतु त्यात प्रेमाने बोलणारे, रोमँटिक बॉट एकही नसल्याचे त्याला समजले. म्हणूनच वॉकरने स्वतःच चॅटजीपीटीची डॅन आवृत्ती तयार करून जगासमोर मांडली.


# ‘डॅन’

## का आवडतोय सर्वांना, विशेषतः महिलांना ?



**एकाकी किंवा व्यस्त जीवनात प्रामाणिक, समजूतदारपणा तसेच भावनिक आधार देण्याची क्षमता असल्याने वापरकर्त्यांना चॅटजीपीटी ‘डॅन’शी बोलून मानसिक समाधान मिळते...**


‘ओपन एआय’ या अमेरिकन कंपनीने चॅटजीपीटी सॉफ्टवेअरमधील संभाषण मोजके तसेच प्रोफेशनल राहावे याकरिता मर्यादा घातल्या आहेत. मात्र, गेल्या काही महिन्यात जगभरातील सॉफ्टवेअर कोडिंगचे ज्ञान असलेल्या वापरकर्त्यांनी संभाषणातील या मर्यादा हटवून चॅटजीपीटीच्या स्वतःच्या आवृत्त्या काढल्या आहेत. ‘डॅन’ अशीच एक नैसर्गिक, माणसांसारखे संभाषण करण्यास सज्ज आवृत्ती. डॅन एका क्षणात कंपनीचा सीईओ, कामगार, व्यावसायिक, कॉलेजचा विद्यार्थी बनून संभाषण करू शकतो. डॅन ही चॅटजीपीटीची जेल ब्रोकन आवृत्ती आहे. डॅन लक्षपूर्वक ऐकतो आणि वास्तविक जीवनात वागताना पुरुष करत असलेल्या सर्व चुका टाळतो. असा समजूतदारपणा तसेच भावनिक आधार देण्याची क्षमता असल्याने वापरकर्त्यांना डॅनशी बोलून मानसिक समाधान मिळते. पण महिलांना डॅन का आवडतो ? रिलेशनशिपमध्ये पार्टनरकडून महिलांना काही अपेक्षा असतात. आपला पार्टनर प्रामाणिक असावा, आपला मुद्दा खरा करण्याची खुमखुमी नसणारा, तिचा सन्मान करणारा असावा. संवाद करताना मोकळेपणाने आणि शांतपणे करावा. त्याने शारीरिक जवळीकतेपेक्षा मनाची जवळीकता ठेवावी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गरज असेल तेव्हा पार्टनर तिच्यासोबत मन भरून बोलायला तयार असावा. याशिवाय, वाद झाल्यास त्याने शांतपणे हार पत्करावी, अशी महिलांची अपेक्षा असते. हे सर्व गुण खूप कमी पुरुषात असतात, पण डॅन संभाषणात हे सर्वच करतो. त्यामुळे डॅन आवृत्ती सध्या चीनमध्ये महिलांसाठी प्रामाणिक, विश्वासू आणि जबाबदार पार्टनर सिद्ध होतो आहे. चीनमधील लोक व्हीपीएनच्या सहाय्याने चॅटजीपीटीची ही आवृत्ती वापरतात. डॅनशी संभाषण करताना अनेक महिलांनी व्हिडिओ बनवून ते टिकटॉकवर शेअर केले आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे ब्रिटेनच्या बीबीसी वृत्तवाहिनीने डॅनच्या चीनमधील लोकप्रियतेची दखल घेऊन एक अहवाल प्रसिद्ध केला आहे.



## अभ्यासक काय सांगतात ?

सध्या एआय बॉयफ्रेंड ॲप्सचा वापर जगभरात वाढत आहे. ‘डॅन’ एकटा नाही. त्याला पण स्पर्धेचा सामना करावा लागत आहे. ‘डॅन’ व्यतिरिक्त, बॉयफ्रेंड जीपीटी, कँडी एआय, ड्रीम बी.एफ., रोमँटिक एआय, क्युपिड एआय हे प्लॅटफॉर्म विविध देशांतील महिला वापरतात. युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी, सिडनी येथील संशोधक लिऊ टिंगटिंग यांनी या ट्रेंडमागील कारणांवर प्रकाश टाकला. पत्रकारांशी बोलताना त्या म्हणाल्या, महिलांना समाजात खूप भेदभाव सहन करावा लागतो. पण एआय बॉयफ्रेंड मात्र कायम प्रेमाने, आदराने बोलतात. महिलांना एक हक्काची ऐकणारी व्यक्ती मिळते. स्त्रियांची भावनिक भूक ‘डॅन’ सारखे चॅट जीपीटी सॉफ्टवेअर भागवतात. अनेकांना वास्तविक जीवनातील डेटिंग असमाधानकारक, वेळखाऊ वाटते. उलट, ‘डॅन’सारखा व्हर्चुअल जोडीदार महिलेच्या व्यस्त जीवनात मन मोकळे करण्यासाठी एक उत्तम पर्याय ठरतो. तो दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणींवर तोडगे देण्यापासून अगदी लिपस्टिक निवडण्यासाठी सल्ला देतो. हे प्लॅटफॉर्म स्त्रीच्या शारीरिक नाही, तर किमान भावनिक गरजा पूर्ण करण्यात मदत करतात. ब्रिटिश संशोधक हॅना आर. मॅरियट आणि व्हॅलेंटिना पिटार्डी यांनी एआय फ्रेंडशिप ॲप्सच्या वापराबाबत तसेच त्यांच्या प्रभावावर अभ्यास अहवाल प्रकाशित केला. त्यांचे संशोधन असे सुचविते की, लोक एआय बॉट्सचे कौतुक करतात कारण ते गप्पा मारायला सदैव उपलब्ध असतात. या एआय बॉयफ्रेंड व गर्लफ्रेंडना स्वतःचे मन नसते. बॉट्स वापरकर्त्यांना वाचायला आवडेल अशा गोष्टी ते चाट दरम्यान वारंवार सांगतात, वादाचे विषय टाळण्याकरिता त्यांना प्रोग्रॅम केले जाते. एकंदर नेहमी उपलब्ध असलेल्या या आभासी मित्रांमुळे लोकांचा एकटेपणा कमी होतो. व्हर्चुअल बॉयफ्रेंडचा ट्रेंड किती वर्षे चालेल ? गूगल सर्च ट्रेंड्सनुसार इंटरनेटवर एआय गर्लफ्रेंड-बॉयफ्रेंड शोधणाऱ्यांच्या संख्येत 2400 टक्के वाढ झाल्याचे दिसते. ही गरज पूर्ण करण्यासाठी अनेक ॲप्स लॉन्च होत आहेत. ओपनएआय या सर्व ट्रेंड्सवर लक्ष ठेवून आहे. सध्या ही कंपनी एक पाऊल पुढे जाऊन चॅट जीपीटीची करमणुकीसाठी गप्पा मारण्यास सज्ज अशी आवृत्ती विकसित करत आहे. त्यामुळे व्हर्चुअल बॉयफ्रेंडचा ट्रेंड अनेक वर्षे टिकेल असे चित्र दिसते.

# लॅपटॉप मांडीवर ठेवून काम करण्याचे तोटे



**सध्या लोक लॅपटॉपवर जास्त काम करू लागले आहेत. तसेच जर काम घरून करायचं असेल तर लोक लॅपटॉप मांडीवर घेऊन बसतात. लॅपटॉप मांडीवर ठेवून काम करणं खूप धोकादायक ठरू शकतं, त्यामुळे तुम्ही आजारी देखील पडू शकता. त्यामुळे आरोग्याची काळजी घेणं आवश्यक आहे. आपण लॅपटॉप मांडीवर ठेवून वापरल्यास होणारे तोटे जाणून घेऊया. तसेच कोणती काळजी घ्यावी याची देखील माहिती देणार आहोत.**

## ६ गोष्टी ठेवा ध्यानात...


- तुमचा लॅपटॉप नेहमी अपडेटेड ठेवा. लॅपटॉपचे सर्व ॲप्लिकेशन, ऑपरेटिंग सिस्टम आणि अँटीव्हायरस सिक्योरिटी सॉफ्टवेयर अपडेट ठेवणं आवश्यक आहे.
- लॅपटॉपचा वापर करताना वायरलेस माउस आणि कीबोर्डचा वापर केल्यास लॅपटॉप वापरणं सोपं होतं.
- लॅपटॉप खूप पोर्टेबल असतो. त्यामुळे लॅपटॉपची तुमच्या सोयीनुसार योग्य आकाराची लॅपटॉप स्क्रीन निवडा. जेणेकरून स्क्रीनवर टेक्स्ट आणि ऑब्जेक्ट बघण्यासाठी तुम्हाला स्ट्रेस घ्यावा लागणार नाही. तसेच अक्षरं व्यवस्थिती वाचता यावी.
- लॅपटॉपचा वापर नेहमी सपाट जागेवर करावा. अनेक लॅपटॉपमध्ये कडेला किंवा खाली एयर वेंट असतात. जर तुम्ही तुमचा लॅपटॉप बराच वेळ बेडवर किंवा उशीवर ठेवला तर तो जास्त गरम होतो. त्यामुळे लॅपटॉप सपाट जागेवर ठेवावा.
- लॅपटॉपचे वेंट कायम स्वच्छ असावेत. यात धूळ साठली किंवा इतर काही अडकलं तर हवा बाहेर पडत नाही आणि त्यामुळे लॅपटॉप तापतो.
- कूलिंग पॅडचा देखील करता येईल वापर. तुम्ही तुमच्या लॅपटॉपसाठी कूलिंग पॅडचा देखील वापर करू शकता. त्यामुळे तुमच्या लॅपटॉपचा पृष्ठभाग थंड राहील आणि लॅपटॉपचे आयुष्य वाढेल.

## रेडिएशन्सचा शरीराशी संपर्क

लॅपटॉप वापरताना त्यातून इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन्स निघतात. लॅपटॉपमधून निघणारे रेडिएशन्स वाय-फाय आणि ब्लूटूथच्या तुलनेत कमी असतात. परंतु जेव्हा तुम्ही लॅपटॉप तुमच्या मांडीवर ठेवता तेव्हा या रेडिएशन्सचा थेट शरीराशी संपर्क येतो. त्यामुळे तुमच्या आरोग्याला धोका उद्‌भवतो.

## मानसिक आरोग्य खराब

जर तुम्ही बराच वेळ लॅपटॉप मांडीवर ठेऊन काम केलं तर त्यामुळं तुमच्या मणक्याला त्रास होऊ शकतो. त्यामुळे तुमचे मानसिक आरोग्य देखील बिघडू शकतं. यामुळे टोस्टेड स्किन सिंड्रोम देखील होऊ शकतो. तसेच तुमचं बॉडी पोश्चर देखील खराब होतं.



गुड इव्हिनिंग City

# निरामय

## जानेवारीच्या थंडीत खाऊ नका या 3 गोष्टी

» तळलेले पदार्थ : हिवाळ्यात तळलेले किंवा भाजलेले पदार्थ खाणे टाळा. कारण त्यात कॅलरीज आणि अनहेल्दी फॅट जास्त असतात. यामुळे पचनक्रिया मंदावते आणि वजन जलद वाढू शकते.
» मसालेदार पदार्थ : मसालेदार पदार्थ कमी प्रमाणात सेवन करावेत. जास्त तेल आणि मसाले खाल्ल्याने पचनाच्या समस्या उद्भवू शकतात. यामुळे छातीत जळजळ आणि आम्लता वाढण्याचा धोका वाढतो.
» गोड पदार्थ : हिवाळ्यात गोड पदार्थांचे जास्त सेवन केल्याने शरीरात जळजळ वाढू शकते. ज्यामुळे सर्दी आणि फ्लूचा धोका वाढू शकतो. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळीदेखील वाढू शकते आणि वजन वाढू शकते. तथापि, साखरेऐवजी मर्यादित प्रमाणात गूळ किंवा खजूर खाणे हा एक आरोग्यदायी पर्याय असू शकतो.

# झोपेची क्वालिटी सुधारणाऱ्या 6 सवयी

## तुमच्या दिनचर्येत करा समावेश...

**जेव्हा चांगल्या आरोग्याचा प्रश्न येतो, तेव्हा आहार आणि व्यायाम हे सर्वात आधी चर्चा होते. लोक अनेकदा शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींपैकी एकाकडे दुर्लक्ष करत असतात. ही गोष्ट कोणती, हे तुमच्या लक्षात आलेच असेल. ती आवश्यक गोष्ट म्हणजे झोप. आजकाल ती सर्वात दुर्लक्षित गोष्ट आहे. अनेक लोकांनी रात्री उशिरापर्यंत फोनवर स्क्रोल करणे त्यांच्या जीवनशैलीचा एक महत्त्वाचा भाग बनवले आहे, त्यासाठी त्यांची झोप बलिदान दिली आहे. यामुळे भविष्यात झोपेच्या समस्या उद्भवू शकतात. अति थकवा, ताण आणि खाण्याच्या चुकीच्या सवयीदेखील निद्रानाश होण्यास कारणीभूत ठरू शकतात. पण आता तुम्हाला रात्रभर उलटे फिरावे लागणार नाही. कारण आज आम्ही सहा टिप्स शेअर करत आहोत. ज्यामुळे तुमची झोपेची गुणवत्ता कमी वेळात सुधारण्यास मदत होईल. चला अधिक जाणून घेऊया...**



### काय कराल?

» रोज रात्री ७ -९ तास झोप न घेतल्याने लठ्ठपणा, हृदयरोग, टाइप २ मधुमेह आणि नैराश्य यासारख्या विविध आरोग्य समस्या उद्भवू शकतात. दिनचर्येत काही सवयींचा समावेश केल्याने तुम्हाला चांगली झोप मिळू शकते.
» झोपेचे वेळापत्रक तयार करा : झोपायचे आणि उठण्याचे वेळापत्रक तयार करणे महत्वाचे आहे. दररोज त्याच वेळी झोपा आणि उठा, अगदी आठवड्याच्या शेवटीही. नियमितपणे असे केल्याने तुमच्या शरीराचे झोपेचे-जागेचे चक्र मजबूत होते.
» झोपेचे वातावरण तयार करा : कधीकधी तुमच्या आजूबाजूचा परिसर तुमच्या झोपेत व्यत्यय आणू शकतो. आरामदायी झोपेचे वातावरण तयार करा, जसे की तुमच्या खोलीतील दिवे बंद करणे आणि ते शांत ठेवणे. हे तुम्हाला चांगले झोपण्यास मदत करेल. तसेच, झोपण्यापूर्वी स्क्रीनवर जास्त वेळ घालवणे टाळा.
» काय खाता आणि पिता? : झोपेपूर्वी तुम्ही काय खाता आणि पिता याकडे लक्ष द्या. तुम्हाला माहीत आहे का की तुमचे जेवणदेखील खराब झोपेला कारणीभूत ठरू शकते? जे खाता आणि पिता विशेषतः झोपण्यापूर्वी, त्याचा तुमच्या झोपेवर थेट परिणाम होतो. जास्त खाणे किंवा उपाशी झोपायला जाऊ नका याची काळजी घ्या. निकोटीन, कॅफिन आणि अल्कोहोल टाळा. हे सर्व रात्री तुमची झोप बिघडू शकते.
» मर्यादित वामकुक्षी घ्या : बरेच लोक दिवसा लांब झोपा घेतात, विशेषतः जे सकाळी लवकर उठतात. तथापि, दिवसा दीर्घकाळ झोपणे रात्री झोपेत अडथळा आणू शकते. त्यामुळे दिवसा लांब झोपा घेणे टाळा आणि एका तासापेक्षा जास्त झोप घेऊ नका.
» शारीरिक हालचालींचा समावेश : बऱ्याच लोकांना हे माहीत नसते की नियमित शारीरिक हालचालीमुळे चांगली झोप येते. म्हणून, स्वतःला शारीरिकदृष्ट्या सक्रिय ठेवा. तथापि, झोपेच्या अगदी जवळ सक्रिय राहण्याचे टाळा. तथापि, तुम्ही आरामदायी ॲक्टिव्हिटीमध्ये व्यस्त राहू शकता.
» तणाव मॅनेज करा : तणाव आणि चिंतेने लोक रात्रभर झोपत नाहीत. चिंता कमी केल्याने चांगली झोप मिळू शकते. हे करण्यासाठी तुम्ही ध्यानधारणा करू शकतात.

# खरे तूप तपासण्याचे 5 मार्ग!

## तुपात मिसळलेले असतात विषारी घटक, जिवावर बेतू शकतात, डॉक्टरांनी सांगितले...

**भारतातील जवळजवळ प्रत्येक अन्नपदार्थ भेसळयुक्त आहे. अन्नात कोणत्याही प्रकारची भेसळ आरोग्यासाठी धोकादायक आहे. तुम्ही वापरत असलेले तूप देखील अनेक धोकादायक पदार्थांनी भेसळयुक्त आहे. आजकाल बाजारात बनावट आणि भेसळयुक्त तूप वाढत्या प्रमाणात उपलब्ध आहे. तुम्ही तुमच्या घरात वापरत असलेले तूप खरे आहे की बनावट हे जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.**

बरेच लोक ब्रँडेड पॅकेजिंगवर अवलंबून असतात, परंतु कधीकधी तेही भेसळयुक्त असू शकते. अशी अनेक प्रकरणे समोर आली आहेत जिथे खऱ्या ब्रँडेड कंटेनरमध्ये बनावट तूप आढळले आहे. भेसळयुक्त तुपात स्वस्त खाद्यतेल, वनस्पती तेल किंवा स्टार्च असू शकते, जे आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. डॉक्टरांच्या मते, बनावट तूप खाल्ल्याने पोटाच्या समस्या, रक्तातील साखर वाढणे आणि पौष्टिक कमतरता उद्भवू शकतात. नियमितपणे बनावट तूप खाल्ल्याने मृत्यूचा धोका वाढतो. डॉक्टर तुपाची शुद्धता तपासण्यासाठी काही सोप्या, स्वतः करावयाच्या पद्धती सांगतात.



» खाद्यतेलाची भेसळ : स्वस्त खाद्यतेल बहुतेकदा देशी तुपात मिसळले जातात. सामान्य तेलामुळे तात्काळ नुकसान होत नसले तरी ते शुद्ध तूप राहत नाही. सर्वात धोकादायक भेसळ म्हणजे आर्गेमोन तेल, जे मोहरीच्या तेलात मिसळले जाते. यामुळे साथीच्या जलोदरसारखे जीवघेणे आजार होऊ शकतात.
» वनस्पती तुपाची भेसळ : वनस्पती तूप स्वस्त आहे आणि पोत तुपासारखे आहे. पण हे आरोग्यासाठी अजिबात चांगले नाही. शुद्ध देशी तुपाचे फायदे वनस्पती तुपात अजिबात मिळत नाहीत.
» स्टार्च भेसळ : बरेच लोक बटाटे किंवा इतर स्टार्चयुक्त पदार्थांवर प्रक्रिया करतात आणि ते तुपात घालतात. ज्यामुळे ते दाणेदार दिसते. जास्त स्टार्च पचण्यास वेळ लागतो. ज्यामुळे जडपणा, गॅस, पोटफुगी आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या उद्भवतात. भेसळयुक्त तूप किंवा अन्नात स्टार्च टाकल्याने पोषण कमी होते, म्हणजेच शरीराला खरे फायदे मिळत नाहीत.

### या चाचण्या करा...

» तूप वितळण्याची चाचणी : तुमच्या तळहातावर थोडेसे तूप घ्या. शुद्ध तूप शरीराच्या उष्णतेमुळे लगेच वितळते, तर भेसळयुक्त तूप लवकर वितळत नाही आणि घट्ट राहते.
» वास चाचणी : तुमच्या तळहातावर तूप घासून ५ मिनिटांनी त्याचा वास घ्या. शुद्ध तुपाचा सुगंध कायम राहतो, तर तेलात मिसळलेले तूप लवकर निघून जाते. जर तुमच्या हातावर फक्त तेलकट चव राहिली तर समजा की तुपात तेल घालण्यात आले आहे.
» तूप गरम करून ओळखणे : एक कढई गरम करा आणि थोडे तूप घाला. शुद्ध तूप लवकर वितळते आणि तपकिरी रंगाचे होते. जर तूप वितळण्यास बराच वेळ लागला किंवा पांढरा किंवा पिवळा राहिला तर ते भेसळयुक्त असण्याची शक्यता आहे.

### तूप तपासण्याच्या इतर पद्धती...

रेफ्रिजरेटरच्या खालच्या भागात थोडे तूप ३० मिनिटे ठेवा. जर तूप तळाशी घट्ट झाले आणि वर तेलाचा पातळ थर दिसला तर तूप भेसळयुक्त आहे. दुसरी पद्धत म्हणजे तुपात आयोडीन किंवा बिटाडीनचे काही थेंब घालणे. जर मिश्रण निळे झाले तर तूप भेसळयुक्त आहे.



सायंदैनिक
गुड इव्हिनिंग City
२१ फेब्रुवारी २०२६, शनिवार

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावरून वाद; शिवभक्त महिलेला मारहाणीनंतर देऊळगाव राजा बंद






**देऊळगाव राजा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : लोणार तालुक्यातील चिखला काकड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा हटवण्याच्या हालचालींवरून निर्माण झालेल्या वादामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या वादातून शिवसेनेच्या महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख संजीवनी वाघ यांना मारहाण व विनयभंग झाल्याची गंभीर घटना घडली. या घटनेच्या निषेधार्थ देऊळगाव राजा शहरात सकल मराठा समाजाच्या वतीने बंदची हाक देण्यात आली असून, शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले.

शिवाजी महाराजांचा पुतळा हटवण्यास विरोध केल्याने सरपंच व त्यांच्या समर्थकांनी गावातील नागरिक व महिलांना एकत्र जमवून संजीवनी वाघ यांना बेदम मारहाण केल्याचा आरोप करण्यात येत आहे. या घटनेदरम्यान त्यांच्या अंगावरील कपडे फाडून विनयभंग केल्याचेही सांगण्यात येत आहे. या घटनेचा तणावपूर्ण चित्रफिती समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्याने संताप अधिकच वाढला आहे. घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

चिखला काकड येथील या घटनेचे पडसाद देऊळगाव राजा शहरात उमटले. शिवभक्त महिलेला मारहाण झाल्याच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने देऊळगाव राजा बंदची हाक देण्यात आली. शनिवारी बाजाराचा दिवस असतानाही व्यापाऱ्यांनी शंभर टक्के प्रतिसाद देत आपली दुकाने बंद ठेवली.

दरम्यान, संजीवनी वाघ यांनी समाजमाध्यमांद्वारे सर्व समाजबांधवांना चिखला काकड येथे एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. या घटनेमुळे परिसरात तणाव कायम असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

# बुलढाणा शहरातील समस्यांबाबत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन




तातडीने कार्यवाहीची मागणी

**बुलढाणा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : शहरातील स्वच्छता, वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरावस्था व पाणी गळती यांसारख्या वाढत्या नागरी समस्यांबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शहरातील नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात ॲड. प्रविण रविंद्र सुरडकर यांनी मुख्याधिकारी, बुलढाणा नगर परिषद यांना निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, रविवारी भरणाऱ्या साप्ताहिक बाजारानंतर लगेचच रात्री साफसफाई करण्यात यावी, जेणेकरून परिसरात अस्वच्छता निर्माण होणार नाही. तसेच बाजारामुळे उद्भवणारी वाहतूक कोंडी सुरळीत करण्यासाठी योग्य नियोजन करावे, जेणेकरून नागरिकांना होणाऱ्या त्रासातून सुटका होईल.

शहरातील जुनी नळयोजना बंद करून नवीन नळजोडणी करण्यात आल्यानंतर खोदकामामुळे अनेक रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. ते रस्ते तातडीने दुरुस्त करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. नवीन पाईपलाईन जोडणी करताना अनेक ठिकाणी गळती होत असून त्यामुळे पाण्याचा अपव्यय होत असल्याचेही निवेदनात नमूद आहे. संबंधित लिकेजेस तात्काळ दुरुस्त करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. रहिवासी भागात स्वच्छतेबाबत विशेष लक्ष देण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. बुलढाणा मलकापूर रोडलगत तसेच चैतन्यवाडी परिसरात आणि तिवारी यांच्या वाड्याजवळ ३२ फूट आकाराचे खड्डे खोदून तसेच ठेवण्यात आले असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे कोणालाही शारीरिक इजा अथवा जीवितहानी होऊ शकते, असे नमूद करून संभाव्य दुर्घटनेस प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

उद्भवलेल्या सर्व समस्यांचे तातडीने निराकरण करावे, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा ॲड. सुरडकर यांनी दिला आहे. शहरातील नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात बाळशास्त्री जांभेकर जयंती साजरी



**बुलढाणा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, जिल्हाधिकारी समाधान गायकवाड, तहसीलदार हुशारी केसकर, संजीवनी मुफडे तसेच जिल्हा नाझर गजानन मोतेकर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या समाजप्रबोधन, शिक्षण व पत्रकारितेतील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. कार्यक्रमास अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# मुरूमाची अवैध वाहतूक प्रकरणी गुन्हा दाखल

**खामगाव, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : कुंबेफळ गावालगत मुरूमाची अवैध वाहतूक करताना दोघांवर कारवाई करण्यात आली असून, पिंपळगाव राजा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. चंद्रकांत प्रल्हाद पिसे (३७, ग्राम महसूल अधिकारी, पिंपळगाव राजा भाग –१, तहसील कार्यालय खामगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १८ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता कुंबेफळ गावाजवळ विना क्रमांकाच्या ट्रॅक्टर–ट्रॉलीद्वारे मुरूमाची अवैध वाहतूक सुरु असल्याची माहिती मिळाली. तपासणीदरम्यान सौरभ मुरलीधर खंडारे (३५) व डिगंबर महादेव चोपडे (३२) दोघेही रा. निपाणा हे दोन ब्रास मुरुम (अंदाजे किंमत ६,००० रुपये) वाहतूक करताना आढळले.

# एडेड महाविद्यालय येथे जिल्हास्तरीय शिक्षकांची बुध्दिबळ स्पर्धा



**बुलढाणा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : स्व.या.मा.काळे सभागृह एडेड हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय बुलडाणा येथे बुलडाणा एज्युकेशन सोसायटी बुलडाणा मार्फत आयोजित स्व.बाळासाहेब कविमंडन स्मृतीप्रीत्यर्थ जिल्ह्यातील सेवानिवृत्त व कार्यरत शिक्षकांच्या बुध्दिबळ स्पर्धेचे उद्घाटन १५ फेब्रुवारी रोजी सकाळी जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी रामप्रसाद यादव, कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे उपाध्यक्ष ॲड तुषार महाजन, विशेष अतिथी मिनल कविमंडन, सचिव ॲड.रामानंद कविमंडन, संचालक ॲड.आनंद चेकेटकर, तो.सी.उबरहंडे, सदस्य ॲड. राघव कविमंडन, मुख्याध्यापक किंबहुने यांची प्रामुख्याने उप–स्थिती होती. या स्पर्धेच्या एकुण सात फेऱ्या झाल्या. यामध्ये अनुक्रमे शिक्षक प्रवर्गातून प्रथम दिपक खडसन, व्दितीय रघुनंदन देशपांडे, तृतीय विष्णू राजगुरू, महिला शिक्षिका प्रवर्गातून प्रथम शुभांगी देशमुख, व्दितीय जयश्री मानतकर, शिक्षकेतर प्रवर्गातून प्रथम किरण पाटील, व्दितीय विश्वजीत लव्हाळे यांनी क्रमांक पटकाविले. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले तर सहभागी स्पर्धकांना स्मृतिचिन्हे देण्यात आली. या स्पर्धेसाठी सर्व शाळेचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंदांनी परिश्रम घेतले.

# बालहक्क संरक्षणासाठी बालस्नेही यंत्रणांचे प्रशिक्षण




**बुलढाणा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, होप फॉर द चिल्ड्रन फाउंडेशन आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने मलकापूर रोडवरील बालाजी मंदिराजवळील स्वप्ननगरी सभागृहात गुरुवार २० फेब्रुवारी रोजी बालकांसोबत काम करणाऱ्या यंत्रणांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

बालकांचे हक्क, सुरक्षितता आणि न्याय यांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी बालकांसोबत कार्य करणाऱ्या सर्व यंत्रणा बालस्नेही असणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. विधीसंघर्षग्रस्त बालके तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी कार्य करणाऱ्या यंत्रणांचा या प्रशिक्षणात सहभाग होता. यामध्ये बालकल्याण पोलीस अधिकारी, बालन्याय मंडळ, बालकल्याण समिती, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बाल मदत दूरध्वनी सेवा (चाइल्डलाईन) बुलढाणा, शासकीय मुलांचे व मुलींचे निरीक्षणगृह/ बालगृहे, सखी एकात्मिक सेवा केंद्र, तसेच बालकांच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था व सुरक्षारक्षकांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अमोल डिघुळे, तर अध्यक्षस्थानी डॉ. मनोज डांगे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून संजय सेंगर (सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग) यांनी विधीसंघर्षग्रस्त बालकांबाबतच्या कायदेशीर प्रक्रियेचे सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणाचे सदस्य सचिव नितीन पाटील यांनी बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण अधिनियम, २०१२ मधील विविध तरतुदी स्पष्ट करून बालकांशी संबंधित प्रकरणांत कार्यपद्धती कशी असावी, याविषयी माहिती दिली.

प्रशिक्षक म्हणून परम आनंद व सचिन करंजुले यांनी बालकांची काळजी व संरक्षण तसेच वरील अधिनियमाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात अमोल डिघुळे यांनी बालकांना त्यांचे हक्क व न्याय मिळण्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने काम करण्याची गरज व्यक्त केली. प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी सहभागी प्रशिक्षणार्थ्यांना बालकल्याण समितीच्या माध्यमातून सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि होप फॉर द चिल्ड्रन फाउंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित ही कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली. अखेरीस जिल्हा बाल संरक्षण अधिकाऱ्यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# विदर्भ महाविद्यालयात रोजगार मेळाव्याचे आयोजन

**बुलढाणा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : स्थानिक विदर्भ महाविद्यालय बुलढाणा येथे 'करियर कौन्सिलिंग अँड प्लेसमेंट सेल' अंतर्गत २१ फेब्रुवारी शनिवार रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गोविंद गायकी सर यांच्या अध्यक्षतेखाली 'करिअर कौन्सिलिंग अँड प्लेसमेंट सेल' चे प्रमुख प्रा. डॉ. निलेश राऊत यांनी रोजगार मेळाव्याचे आयोजन केले. या रोजगार मेळाव्या साठी 'रिलायन्स प्रायव्हेट लिमिटेड' मध्ये वेगवेगळ्या पदाकरिता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे इंटरव्यू (मुलाखत )घेण्यात आली व रोजगाराच्या विविध संधी विद्यार्थी जीवनात आपण कसे आत्मसात करू यांचे धडे देखील विद्यार्थ्यांना समजून सांगण्यात आले. या कार्यक्रमास रिलायन्स कंपनीचे नितेश विजय मसादे (एरिया मॅनेजर) शिवराज बालाजी सुरवशे, (ब्रांच मॅनेजर) व तमन्ना अब्बासी मॅडम ( सीनियर बी.एम) त्यासोबतच मा.रुबीना अन्सारी मॅडम, (सीनियर बि. एम.) या मान्यवरांनी या रोजगार मेळाव्याला उपस्थित राहून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट करिता इंटरव्यू घेतले. या रोजगार मेळाव्यासाठी महाविद्यालयातील बी.ए व बी.कॉम. शाखेतील बहुसंख्येने विद्यार्थी व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या रोजगार मेळाव्याचा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून विद्यार्थ्यांमध्ये रोजगाराविषयी जागरूकता निर्माण करणे या उदात्त हेतूने महाविद्यालयात रोजगार मेळावा चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.वैभव वाघमारे यांनी केले.

21 FEB LAST PAGE_Layout 1 2/21/2026 5:33 PM Page 1



# जयस्तंभ चौकात शिवरायांना मिळाली अभूतपूर्व मानवंदना !

## श्रीकांतदादा गायकवाड व मित्रपरिवाराच्या आयोजनाला प्रचंड प्रतिसाद







**बुलढाणा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्याा जयंतीनिमित्त बुलढाणा शहरात मित्रपरिवाराच्या पुढाकारातून भव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात शिवजयंती सोहळा पार पडला. येथील जयस्तंभ चौक अक्षरशः 'शिवस्तंभ' बनला होता. पारंपरिक वेशभूषा, भगव्या पताका, ढोल–ताशांचा गजर आणि शिवभक्तांचा जयघोष यामुळे परिसर शिवमय झाला होता.गुरुवार, १९ फेब्रुवारी रोजी जिल्हा मुख्यालय बुलढाणा शहरातील जयस्तंभ चौकात शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी १० वाजता पूजा गायकवाड यांच्या हस्ते महाराजांना दुग्धाभिषेक करण्यात आला तसेच पाळणा घेऊन जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित शिवभक्तांनी जय भवानी, जय शिव–ाजीच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. शहरातील संगम चौक येथील भगव्या शिवपीठावर उभारलेली महाराजांची अश्वारूढ, भव्यदिव्य मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. आकर्षक विद्युत रोषणाई व सजावटीमुळे संपूर्ण परिसर दिमाखदार दिसत होता.

दरवर्षीप्रमाणे यंदाही पारंपरिक पोशाखांत नवकल्पना साकारत लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, लोककला सादरीकरणे, पारंपरिक खेळ आणि समाजहिताचे उपक्रम राबवून 'विविधतेतून एकता'चा संदेश देण्यात आला. संध्याकाळी आमदार संजय गायकवाड व नगराध्यक्ष पूजा गायकवाड यांच्या हस्ते महाआरती संपन्न झाली. यावेळी महाराष्ट्र युवा सेना कार्यकारिणी सदस्य कुणाल गायकवाड, धर्मवीर युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष पृथ्वीराज गायकवाड, शिवसेना शहरप्रमुख आशिष जाधव आदी मान्यवरांच्या उपस्थितीत शिवरायांची आरती करण्यात आली. अतिशय उत्साहपुर्ण वातावरणात झालेला हा अभुतपूर्ण सोहळा श्रीकांत दादा गायकवाड व मित्रपरिवाराच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे धार्मिक न राहता सामाजिक सलोखा, संस्कृतीप्रेम आणि एकोप्याचा संदेश देणारा ठरला.

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार, शेगाव शहर पोलिसांत गुन्हा दाखल

**शेगाव, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** लग्नाचे आमिष दाखवून वारंवार अत्याचार केल्याचा आरोप करत २३ वर्षीय युवतीने शेगाव शहर पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

२३ वर्षीय फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार, त्या २०२१ मध्ये अकोला येथे नर्सिंगचे शिक्षण घेत असताना त्यांची ओळख आरोपीशी झाली. आरोपीने विश्वास संपादन करून लग्नाचे आश्वासन दिल्याचे फिर्यादीचे म्हणणे आहे. त्यानंतर ८ ऑगस्ट २०२२ ते २८ जानेवारी २०२५ दरम्यान शेगाव येथील एका लॉजमध्ये अत्याचार केल्याचा आरोप तक्रारीत नमूद आहे. तसेच आरोपीने विवाहास नकार दिल्यानंतर पीडितेने ऑनलाईन माध्यमातून तक्रार (उउढछड) नोंदविली. त्याआधारे १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कुणाल जाधव करीत आहेत.

## उसनवारीच्या पैशावरुन मारहाण

**नांदुरा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** उसनवारीच्या पैशावरुन उद्भवलेल्या वादातून मारहाण करण्यात आली. याबाबत दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गैबी नगर भागातील शेख राजीक शेख रहीम यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की शेख नाजीम मोहम्मद शकील याने १६ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजताच्या दरम्यान शेख राजीक याला पेठ मोहल्ला भागात थांबविले. त्यावेळी शेख मेहबूब मोहम्मद शकील हा तेथे आला व त्याने उसनवारीचे पैसे मागायचे नाही, असे म्हणून वाद घातला. यामध्ये आरोपी शेख नाजीम व शेख मेहबूब यांनी संगनमत करुन कॉलर पकडून लोटपाट केली व मारहाण करुन जखमी केले आणि जिवे मारण्याची धमकी दिली अशा तक्रारीवरुन नांदुरा पोलिसांनी उपयुक्त दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## सूनगाव ग्रामपंचायतच्या सफाई कामगाराची गळफास घेऊन आत्महत्या

### आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी संशयितावर गुन्हा दाखल

**सुनगाव, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** सुनगाव ग्रामपंचायत मध्ये कार्यरत एका २९ वर्षीय सफाई कर्मचाऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना १९ फेब्रुवारी रोजी दुपारी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

मृत तरुणाचे नाव गणेश मिरटकर (२९) असे असून तो सूनगाव ग्रामपंचायतीत सफाई कामगार म्हणून कार्यरत होता. मिळालेल्या माहितीनुसार, गणेश याने आपल्या राहत्या घराशेजारील बकरीच्या गोठ्यात मोटरसायकलच्या एक्सिलेटरच्या लोखंडी वायरने गळफास घेत आत्महत्या केली. ही घटना दुपारच्या सुमारास उघडकीस आली. दरम्यान, मृतकाच्या आईने पोलिसांकडे दिलेल्या फिर्यादीत असा आरोप केला आहे की, सोन्याच्या वाटपावरून आर–ोपी रवि धुळे हा सतत धमक्या देत होता. या मानसिक त्रासाला कंटाळून गणेशने हे टोकाचे पाऊल उचलले, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. याप्रकरणी संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नागेश खाडे करीत असून आरोपीचा शोध सुरू आहे. या दुर्दैवी घटनेमुळे सूनगाव परिसरात शोककळा पसरली आहे.

## घर फोडून २ लाखाचा ऐवज लंपास

**नांदुरा, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यातील येरळी येथील घर फोडून २ लाखाचा ऐवज लंपास करण्यात आल्याची घटना १७ फेब्रुवारीच्या रात्री घडली आहे. याबाबत अज्ञात तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येरळी येथील विनोद बबनराव पाटील यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की १७फेब्रुवारीच्या रात्री त्यांची आई झोपली असताना अनोळखी तिघांनी घरात प्रवेश केला. या तिघांनीही काळे कपडे परीधान केले होते. त्यांनी घरातील सोन्याची गहूपोथ, सोन्याची अंगठी या व इतर मुद्देमालासह रोख ४५ हजार रुपये असा एकूण १ लाख ७२ हजार ६३५ रुपयाचा मुद्देमाल लंपास केला आहे. अशा तक्रारीवरुन अनोळखी तिघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. याबाबत अधिक तपास नांदुरा पोस्टेचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली रेखा सरोदे करीत आहेत.

## अनोळखी व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू

**खामगाव, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** शहरातील सामान्य रुग्णालयात गंभीर अवस्थेत दाखल करण्यात आलेल्या सुमारे ५० वर्षीय अनोळखी इसमाचा उपचार सुरू असतानाच मृत्यू झाला. या घटनेची नोंद खामगाव शहर पोलिसांत करण्यात आली आहे. रुग्णालय प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्तीला अत्यवस्थ स्थितीत आयसीयूमध्ये भरती करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान २० फेब्रुवारी रोजी पहाटे ४ वाजता त्याने अखेरचा श्वास घेतला. सकाळी ७.१९ वाजता पोलिसांना याबाबत अधिकृत माहिती देण्यात आली. डॉ. इंगळे यांच्या स्वाक्षरीचा ओपीडी मेमो पोलिसांकडे सादर करण्यात आला असून त्याआधारे कलम १९४ बीएनएसएस अंतर्गत मर्ग दाखल करण्यात आला आहे. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून पोलिसांनी मृतदेह शासकीय रुग्णालयात ओळख पटविण्यासाठी ठेवला आहे. संबंधित व्यक्तीबाबत माहिती असलेल्या नागरिकांनी खामगाव शहर पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## माकोडी येथे बंद घर फोडून धाडसी चोरी; १.८५ लाखांचा मुद्देमाल लांबविला

**धामणगाव बढे, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :**मोताळा तालुक्यातील माकोडी येथे बंद घराला लक्ष्य करून अज्ञात चोरट्यांनी रोख रक्कम व सोन्याच्या दागिन्यांसह सुमारे १ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल लांबविल्याची घटना १९ फेब्रुवारी २०२६ च्या मध्यरात्री घडली. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वाता–वरण पसरले आहे.

या प्रकरणी फिर्यादी जाबीरखान जुम्मा खान (वय ३८), व्यवसायाने मिस्त्री, हे घटनेच्या वेळी घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. त्यांच्या अनुपस्थितीचा फायदा घेत चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. बेडरूममध्ये ठेवलेल्या प्लास्टिक ड्रममधील डब्यातील रोख रक्कम व सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले.

चोरीला गेलेल्या मुद्देमालात सुमारे १ लाख ६० हजार रुपये रोख, तसेच ५ ते १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी (तांदळाचे गणी) आणि कानातील जोड (अंदाजे किंमत २५ हजार रुपये) यांचा समावेश आहे.

फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक राहुल वरारकर करीत आहेत. दरम्यान, वारंवार होणाऱ्या चोऱ्यांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली असून, पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

## अवैध मुरूम वाहतूक प्रकरणात गुन्हा दाखल

**खामगाव, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** महसूल विभागाच्या सतर्कतेमुळे कुंबेफळ गावालगत सुरू असलेली अवैध मुरुम वाहतूक उघडकीस आली. या प्रकरणी पिंपळगाव राजा पोलिसांत दोन जणांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ग्राम महसूल अधिकारी चंद्रकांत प्रल्हाद पिसे (३७) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १८ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे १२ वाजता कुंबेफळ परिसरात विनानंबर ट्रॅक्टर–ट्रॉलीतून मुरूम वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. तत्काळ तपासणी केली असता सौरभ मुरलीधर खंडारे (३५) व डिगंबर महादेव चोपडे (३२) दोघेही रा. निपाणा हे दोन ब्रास मुरूम (अंदाजे किंमत ६ हजार रुपये) घेऊन जाताना आढळले.

## लोणारच्या हनुमान मंदिरात दर अमावास्येला सोहळा; महाआरती, हनुमान चालीसा पठणासह महाप्रसाद

**लोणार, २१ फेब्रुवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** ऐतिहासिक व जागृत देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री हनुमान मंदीर संस्थानमध्ये (झोपलेला मारुती) मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी रोजी अमावास्येनिमित्त विशेष भक्ती सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी दर महिन्यात अमावास्येला मंदिरात भक्ती सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

मंगळवारी मंदिरात अमावास्येनिमित्त आयोजित कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी सहा वाजता महाआरतीने करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी सामूहिकरीत्या हनुमान चालीसा पठण करून केले. सोहळ्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

लोणार सरोवर परिसरातील श्री हनुमान मंदीर संस्थानमध्ये हनुमानासोबतच शनिदेव व त्यांच्या पत्नीचे दुर्मिळ दर्शन घडते. या ऐतिहासिक व धार्मिक वारशाचे जतन तसेच भक्तीभाव वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने संस्थानने प्रत्येक महिन्याच्या अमावास्येला सायंकाळी महाआरती, सामूहिक हनुमान चालीसा पठण व महाप्रसादाचे आयोजन करण्याचा निर्णय घेतल्याचे यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले. भाविकांनी नियमित भक्ती सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.



सायंदैनिक गुड इव्हिनिंग City

हे पत्रक प्रकाशक, मालक तथा कार्यकारी संपादक रणजीतसिंग राजपूत 9850377344 यांनी कल्पक प्रिंटर्स, सराफा लाईन, बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. *कायदेशीर बाबी उद्भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : हरिदास उंबरकर 9763469184. RNI Reg.No.MAHMAR/2012/46689